**दक्षतारोध ओलांडण्यास मंजूरी देण्याकरिता निकष.**

**महाराष्ट्र शासन,**

सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०८९/९७१/प्र.क्र.१६/८९/बारा,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक - २८ फेब्रुवारी, १९९०.

**संदर्भ :-** (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०६०/डी, दि.७ जून, १९६०.

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/दहा, दि.२८ ऑक्टोंबर, १९७६.

(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८८/२२२३/प्र.क्र.४/८९/बारा, दिनांक - १६ मार्च, १९८९.

(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८९/९७१/प्र.क्र. १६/८९/बारा, दिनांक - ३० सप्टेंबर, १९८९.

**परिपत्रक :-** शासकीय कर्मचा-यांना / अधिका-यांना वेतनश्रेणीतील दक्षतारोध ओलांडण्यासाठी मंजुरी देण्याकरिता त्यांचा गोपनीय अहवाल किमान कोणत्या दर्जाचा असावा, त्याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.एसआरव्ही-१०८८/२२२३/प्र.क्र.४/८९/बारा, दिनांक १६ मार्च, १९८९ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेले आहेत. त्याकरिता संबंधित कर्मचा-यांचा / अधिका-यांचा दर्जा अथवा त्यांची योग्यायोग्यता तपासताना किती वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत, त्याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.एसआरव्ही-१०८९/९७१/प्र.क्र.१६/८९/बारा, दिनांक ३० सप्टेंबर, १९८९ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेले आहेत. या आदेशांच्या कार्यवाहीच्या संदर्भात काही विभागांनी जे मुद्दे उपस्थित केले होते, त्यांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

| मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|
| १) दि.१६ मार्च, १९८९ च्या आदेशान्वये अस्तित्वात आलेला निकष कोणत्या (दिनांकापासूनच्या) प्रकरणांकरिता लागू होईल? | वर्ग १ ते वर्ग ३ मधील जे सेवक दि.१६ मार्च, १९८९ अथवा तद्‌नंतर वेतनश्रेणीतील दक्षतारोधाच्या टप्प्यावर आलेले आहेत, त्यांची प्रकरणे दिनांक १६ मार्च, १९८९ च्या आदेशातील निकषाच्या आधारे तपासण्यात यावीत. त्यापूर्वीची प्रकरणे तत्कालीन निकषाच्या आधारे निकालात काढण्यात यावीत. तसेच दि.१६ मार्च, १९८९ पूर्वीची जी प्रकरणे तत्कालीन दि.२८ ऑक्टोंबर, १९७६ च्या आदेशानुसार तपासण्यात येऊन संबंधित सेवकांना दक्षतारोध पार करण्यास अनुमती न देण्याचा निर्णय झालेला असेल अशा सेवकांची दि.१६ मार्च,१९८९ अथवा तद्‌नंतर योग्यायोग्यता तपासताना दि.१६ मार्च,१९८९ च्या आदेशातील निकष विचारात घेणे आवश्यक आहे. |
| २) शासकीय सेवकांना दक्षतारोध ओलाडण्यास मंजूरी देण्याकरिता त्या सेवकाचे दक्षतारोधाच्या टप्प्यावर आलेल्या वर्षापर्यन्तचे सलग पाच वर्षाचे गोपनीय अहवाल किमान चांगला दर्जाचे असणे आवश्यक आहे काय? | दक्षतारोध पार करण्यास अनुमती देण्याकरिता शासकीय सेवकाचे अलिकडचे सलग पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन त्याच्या दर्जाचे एकंदरीत मूल्यमापन (overall assessment) करण्यात यावे, असे अपेक्षित आहे. त्यानुसार निर्णय घेताना पांच वर्षामधील प्रत्येक वर्षाचा अहवाल किमान चांगला असला पाहिजे असे नाही, परंतु पांच वर्षाचा अहवालाचा एकंदरीत दर्जा किमान चांगला असावा. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. म . भणगे,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.